Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# करप्रणालीत आमूलाग्र बदल करण्याची गरज

14 Nov 2011, 0300 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

सुरेश प्रभू यांचे प्रतिपादन

म.टा.प्रतिनिधी, पुणे

'कायदा-सुव्यवस्थेसह वेगवेगळ्या पातळ्यांवर सरकारी यंत्रणांची निराशाजनक कामगिरी बघता आणखी काही दिवसांनी नागरिक कर भरणे सोडून देतील. त्याचे पर्यवसान देशात अराजकता माजण्यात होईल. त्यामुळे सरकारने शिक्षण, आरोग्यासह पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देत देशातील करप्रणालीमध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे.' असे विचार माजी केंदीय मंत्री सुरेश प्रभू यांनी मांडले.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळातफेर् (एमकेसीएल) 'चेंज फॉर बेटर' या त्रैमासिकाच्या वर्धापन आवृत्तीचे प्रकाशन प्रभू यांच्या हस्ते रविवारी झाले. त्या वेळी ते बोलत होते. चेंज फॉर बेटरचे मुख्य संपादक भानू काळे, अर्थक्रांतीचे संस्थापक अनिल बोकील, 'एमकेसीएल'चे विवेक सावंत उपस्थित होते. करप्रणालीमध्ये आमूलाग्र बदलांसाठी बोकील यांनी केलेल्या संशोधनावर 'चेंज ऑफ बेटर'चा अंक आधारित आहे.

देशातील सध्या अस्तित्वात असलेली करप्रणाली बंद करत केवळ बँकांच्या व्यवहारांवर ठरावीक कर आकारण्यात यावा. या व्यतिरिक्त उच्च मूल्यांच्या म्हणजेच १००, ५०० आणि एक हजार रुपयांच्या नोटा चलनांमधून बाद करत देशातील सर्व नागरिकांना बँकिंगमध्ये सहभागी करून घ्यावे, ही बोकील यांची अर्थक्रांतीची मूळ कल्पना आहे.

यावर प्रभू म्हणाले, 'अर्थक्रांतीची कल्पना आदर्शवत आहे. कर संकलनातून होणाऱ्या भ्रष्टाचाराला यामुळे आळा बसेल. मात्र, ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी संपूर्ण देशाला बँकिंग क्षेत्रात सहभागी करून घेण्याचे मोठे आव्हान आहे. सध्या करप्रणाली राबवताना जसे उत्पन्न वाढते त्या प्रमाणात प्राप्तीकर वाढतो. मात्र, अर्थक्रांती तत्त्वानुसार बँकेतील प्रत्येक व्यवहारावर ठरावीक रक्कम कर म्हणून कापण्यात आली, तर संपूर्ण कररचनेचा फेरआढावा घ्यावा लागेल.'

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768